**"जून २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- दिनांक २ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील चारही आहार / उपाहार-गृहासाठी मेसर्स यश अॅग्रो फूडस यांना गाईचे दूध रु.३९/- प्रतिलीटर व म्हशीचे दूध रु.४४.५०/- प्रतिलीटर या दराने पुरवठा करण्यासाठी स्वीकृत केलेल्या निविदेस दिनांक १ एप्रिल ते ३० जून २०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ७ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयातील सहायक कक्ष अधिकारी, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक व लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करण्यासाठी विभागीय पदोन्नती समिती क्रमांक-२ ची पुनर्रचना करण्यात आली आहे.
- दिनांक ६ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या आहार / उपाहारगृहामार्फत खान-पान सेवा पुरवितांना अतिरिक्त रक्कम आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १४ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गातील अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक १५ जून २०१७ च्या शासन अधिसुचनेन्वये महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप (दुसरी सुधारणा) नियम २०१७ प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- ऑनलाईन कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठी महापार (mahapar.maharashtra.gov.in ही संगणक प्रणाली सुरु झाली आहे. या प्रणालीत विहित केलेल्या निवडक गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन नोंदविण्यात येणार आहे. यासाठी दिनांक २३ जून २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये "महापार" या संगणक प्रणालीच्या कार्यान्वयानासाठी संबंधित संवर्गाचे मंत्रालयातील संवर्ग नियंत्रण कक्षाचे सहसचिव / उपसचिव यांना राज्य परिरक्षक (State Custodian / Primary Custodian) तर संबंधित संवर्गाचे मंत्रालयातील संवर्ग नियंत्रण कक्षाचे अवर सचिव / कक्ष अधिकारी यांना माहिती व्यवस्थापक (EMD Manager) म्हणून घोषित करण्यात आले आहे. अतिरिक्त परिरक्षक (Alternate Custodian) व पार व्यवस्थापक (PAR Manager) घोषित करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावयाची आहे.
- दिनांक २९ जून २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये ऑनलाईन पद्धतीने कार्यमुल्यमापन अहवाल नोंदविण्यासाठी विकसित करण्यात आलेली महापार (mahapar.maharashtra.gov.in ही संगणक प्रणाली कार्यान्वित झाली असून, ती दिनांक ३ जुलै २०१७ पासून प्रत्यक्षात वापरासाठी उपलब्ध होणार आहे. सन २०१६-१७ च्या कार्यमुल्यमापन अहवालाकरिता आता विहित केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावयाची आहे.

**(ख)<u>पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- अवर सचिव संवर्गातील १३, कक्ष अधिकारी संवर्गातील २४ व सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ९१ कर्मचाऱ्यांना अनुक्रमे उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी संवर्गात पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत.

**(ग) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील २४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- उपसचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील अनुक्रमे २, १२, २, १ अशा १७ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तसेच ६ अवर सचिवांच्या मुदतपूर्व बदल्या करण्यात आल्या आहेत. अवर सचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी अधिकाऱ्याच्या बदलीला स्थगिती देण्यात आली आहे. अवर

सचिव, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक संवर्गातील अनुक्रमे १, ११, ९ अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत. ३ अवर सचिव, १७ कक्ष अधिकारी, ४० सहायक कक्ष अधिकारी, १ वरिष्ठ स्वीय सहायक, २ निवडश्रेणी लघुलेखक, ६ उच्चश्रेणी लघुलेखक, ५ निम्नश्रेणी लघुलेखक व १५ लिपिक-टंकलेखक यांना सामान्य प्रशासन विभागामार्फत बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आले.

- उपसचिव, अवर सचिव अनुक्रमे १ व २ अशा ३ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे. २ अवर सचिवांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे. ३ अवर सचिव व १ कक्ष अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- १७ सहसचिव व १ अवर सचिव यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले.
- ३ उपसचिव व १ सहायक कक्ष अधिकारी यांच्या पदस्थापनेत बदली करण्यात आला आहे.

### (घ) <u>सेवाप्रवेश नियम</u>

- दिनांक ६ जून २०१७ च्या अधिसूचनेन्वये "बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, गट-क (सेवाप्रवेश) नियम २०१७" प्रसिद्ध करण्यात आले आहेत. हे नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेत नसलेल्या बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, गट-क पदांना लागू आहेत.
- दिनांक ६ जून २०१७ च्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-ड पदांचे (सेवाप्रवेश) नियम २०१७" प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

***********